# 'मेट्रो ३' उत्पन्नवाढीसाठी आत्तापासूनच तयारी

## स्टॉल्स, एटीएमद्वारे मिळवणार भाडे

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईला उत्तर-दक्षिण जोडणाऱ्या 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३'ने महसुलासाठी स्टॉल्स, एटीएम यांना भाड्याने जागा देण्याची तयारी केली आहे. त्यातून मिळणारा महसूल किती व कसा असावा, यासाठी सल्लागार नेमणुकीची निविदा काढली आहे. त्यासाठी १२ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

'मेट्रो-३' दोन टप्प्यात सुरू होईल. पहिला टप्पा सीप्झ ते वांद्रे-कुर्ला संकुल (उत्तर) भाग तर दुसरा टप्पा बीकेसी (दक्षिण भाग) ते कफ परेड, असा असेल. पहिला टप्पा डिसेंबर २०२३पासून तर दुसरा टप्पा जून २०२४ ला सुरू होईल. या मार्गावर २७ स्थानके असतील. प्रवासी तिकिटाखेरीज अन्य



पद्धतीनेही (नॉन फेअर बॉक्स रेव्हेन्यू) महसूल मिळवला जाणार आहे.

'मेट्रो-३'ची उभारणी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) करत आहे. एमएमआरसीएलनुसार, मेट्रो-३ ही ३० सरकारी रोजगार समूहांशी जोडली जाणार आहे. १२हून अधिक शैक्षणिक संस्था, ११ मोठी रुग्णालये, १० मोठ्या वाहतूक हबद्वारे ३० लाख लोकसंख्येशी ही मेट्रो जोडली जाणार आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या लोकसंख्येसाठी स्थानकांवर विविध प्रकारच्या सोयीसुविधांची गरज असेल. त्यामध्ये खाण्याचे स्टॉल्स, एटीएम केंद्र, पुस्तकांचे स्टॉल्स, खेळण्यांची दुकाने, ग्राहकपयोगी दुकाने आदींचा समावेश असेल, असे सांगण्यात आले आहे.

### स्टेशन नामकरणाद्वारे वार्षिक २१६ कोटींचा महसूल

एमएमआरसीएलने याआधी मेट्रो-३वरील स्थानकांच्या नामकरणाद्वारेही महसूल मिळवण्याची रचना केली आहे. एकूण २७ स्थानकांचे नामकरण विविध कंपन्यांच्या नावे असेल. त्याआधारे वार्षिक २१६ कोटी रुपयांचा महसूल दरवर्षी पाच टक्के वाढीसह कंपनीला मिळणार आहे.